महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781 / 82 / 83

E-MAIL
sscboardpune@gmail.com

क्रमांक- पु.वि मं –शाखा – अ/6727
पुणे ४११ ००५
दि.१९.१२.२०२५
23

प्रति ,
प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
जिल्हा -पुणे /अहमदनगर /सोलापुर

विषय : उच्च माध्यमिक प्रमाणापत्र (इ१२वी) २०२५ परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र रद्द व हजेरी क्षमापित प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भ : १. क्र.रा.मं ./परिक्षा- ८/८७८७ दि.२८/१२/२०१६ चे पत्र.
२. क्र. रा.मं./परीक्षा -८/५९३० दि.२१/१०/२०२२ चे पत्र.
३.क्र.रा.मं./परीक्षा -८/१२९ दि. ११/०१/२०२४ चे पत्र.
४.क्र.रा.मं/परीक्षा -८/४८६४ दि.१८/१२/२०२५ चे पत्र.

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, मंडळ नियमावलीतील नियम क्रमांक ८८(१) मधील तरतुदीनुसार नियमित विद्यार्थ्यांची प्रथम व द्वितीय सत्रातील हजरी स्वतंत्रपणें ७५ % असणेआवश्यक आहे. प्रथम सत्रातील हजेरी शैक्षणिक वर्षात कनिष्ठ महाविद्यायल सुरु झाल्यापासून १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत व द्वितीय सत्रातील हजेरी ही दिनांक १६ ऑक्टोबर२०२४ते ३१ जानेवारी २०२५ अखरेपर्यतच विचारात घ्यावयाची आहे.

नियमानुसार ज्या विद्यार्थ्याचे प्रथम व द्वितीय सत्रातील हजेरीचे प्रमाण ७५% पेक्षा कमी असेल अशा विद्यार्थ्यांना नो कॅन्डीडेट करण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाकडे पाठवितांना संबंधित तक्त्यामध्ये **नो कॅन्डीडेट** करावे असा स्पष्ट उल्लेख करावा. (शिफारस आहे /शिफारस नाही असा उल्लेख करु नये) 'अशा विद्यार्थ्यांची उपस्थिती मंडळाच्या नियमानुसार कमी भरत असल्याने त्यांना मंडळाच्या परीक्षेस बसता येणार नाही' अशा आशयाचे पत्र प्राप्त होताच संबंधित विद्यार्थ्याचे प्रवेश पत्र आपणाकडे प्राप्त झाल्यास सदर प्रवेशपत्र नो कॅन्डीडेट केलेल्या विद्यार्थ्याना न देता मंडळाकडे त्वरीत जमा करण्यात यावीत. दोन्ही सत्रातील अगर कोणत्याही एका सत्रातील हजेरी ६० %पेक्षा कमी असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यांची हजेरी नियमानुसार क्षमापित करता येणार नाही. ब-याच वेळा प्राचार्य पुरेशी उपस्थिती नसताना सुध्दा विद्यार्थ्याची माहिती अर्धवट व अत्यंत उशिरा पाठवून हजेरी क्षमापित करण्याबाबतचा प्रस्ताव पाठवित असतात. नियमानुसार अशी प्रकरणे विलंबाने सादर केल्यामुळे हजेरी क्षमापित करता येत नाही. तेव्हा हे सर्व टाळण्यासाठी असे स्पष्ट करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्याची हजेरी प्रथम सत्रामध्ये ७५ %पेक्षा कमी असेल व द्वितीय सत्रामध्ये सुध्दा (म्हणजे दिनांक ०५ फेब्रुवारी २०२५) ७५ % पेक्षा कमी असेल अशा विद्यार्थ्यांची आवेदन पत्र रद्द करण्याचा प्रस्ताव या मंडळाला हस्तपोहोच किंवा उशिरात उशिरा दिनांक ०५ फेब्रुवारी २०२५ पूर्वी प्राप्त होईल अशा बेताने पोस्टाने, प्रतिनिधीमार्फत पाठवावा.या मुदतीनंतर प्राप्त होणारे हस्तपोहोच /पोस्टाव्दारे प्राप्त प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही.याची नोंद घ्यावी. ०५ फेब्रुवारी २०२५ नंतर प्राप्त होणा-या प्रस्तावास विद्यार्थ्याचे

नैसर्गिक आपत्तीचे कारण वगळता इतर कोणत्याही कारणास्तव आवेदनपत्र रद्द करण्याबाबत संदर्भिय पत्र क्र. १च्या पत्रानुसार रु १०००/प्रती विद्यार्थी आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ज्या विद्यार्थ्याची प्रथम व व्दितीय सत्रातील हजेरी ७५% पेक्षा कमी असून अनुपस्थिती क्षमापित करण्यासाठी समर्थनीय कारणाखाली नसेल अशा विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र रद्द करण्याचे प्रस्ताव ,तसेच ज्या विद्यार्थ्यांची प्रथम वा व्दितीय वा दोन्ही सत्रातील हजेरी स्वतंत्रपणे ६०% पेक्षा जास्त परंतु ७५ % पेक्षा कमी असेल व त्यासाठी वैद्यकीय अथवा अन्य समर्थनीय कारण असेल व आपणास शिफारस करण्यायोग्य वाटत असेल तरच अशा विद्यार्थ्यांची हजेरी क्षमापित करण्याचे प्रस्ताव योग्य त्या पुराव्यासह मंडळ कार्यालयाकडे सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये विद्यार्थ्याच्या आवेदनपत्र क्रमांकासह दर्शवून वरील दिनांकापूर्वी मंडळास प्राप्त होतील अशा बेताने पोस्टाद्वारे अथवा कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रतिनिधीमार्फत समक्ष पाठवावेत. याबाबतची संपूर्ण जबाबदारी क. महा. प्राचार्य यांची राहील याची नोंद घ्यावी.

<u>टिप-</u> आवेदन पत्र रद्द करण्यात आलेल्या विद्यार्थ्याची प्रवेशपत्र त्वरीत मंडळ कार्यालयाकडे सुपूर्त करण्यात यावीत.कोणत्याही परिस्थितीत आवेदन पत्र रद्द व हजेरी क्षमापित प्रस्तावातील प्रवेशपत्र मंडळाच्या परवानगीशिवाय विद्यार्थ्यांना देण्यात येवू नयेत.अपात्र विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य यांची राहील.सोबत तक्त्यात नमूद केल्यानुसार विद्यार्थ्याची माहिती भरून तक्ता व पत्र सादर करण्यात यावे.

(औंदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ
पुणे ४११ ००५

प्रत माहितीसाठी

१. विभागिय शिक्षण उपसंचालय ,पुणे विभाग पुणे

२.शिक्षणाधिकारी माध्यमिक
जिल्हापरिषद पुणे /अहमदनगर /सोलापूर

परीक्षा केंद्र क _____ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु / मार्च, 2025 क.महा. सांकेतांक | | | | | | | |

हजेरी क्षमापित करण्याबाबत संकलित तक्ता हजेरी क्षमापित

प्रथम सत्र दि.15 जून ते 15 ऑक्टोबर

द्वितीय सत्र दि.16 ऑक्टोबर ते 05 फेब्रुवारी

अ.क्र.	बैठक क / आवेदनपत्र क.	विद्यार्थ्याचे नाव	कामाचे दिवस		उपस्थिती दिवस		उपस्थिती शेकडा		मुख्याध्यापक / प्राचार्य शिफारस (स्पष्ट उल्लेख)
			प्रथम सत्र हजर दिवस	द्वितीय सत्र हजर दिवस	प्रथम सत्र हजर दिवस	द्वितीय सत्र हजर दिवस	प्रथम सत्र हजर दिवस	द्वितीय सत्र हजर दिवस	

टिप : मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी शिफारस करताना **हजेरी क्षमापित करावी** असा स्पष्ट उल्लेख करावा

स्थळ –

दिनांक / /202

मुख्याध्यापक / प्राचार्य
सही व शिक्का

D:/chafe/formar

परीक्षा केंद्र क _____ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु / मार्च, 2025 क.महा. सांकेतांक | | | | | | | |

आवेदनपत्रे रदद करण्याबाबत संकलित तक्ता **No Candidate**

प्रथम सत्र दि.15 जून ते 15 ऑक्टोबर

द्वितीय सत्र दि.16 ऑक्टोबर ते 05 फेब्रुवारी

अ.क्र.	बैठक क / आवेदनपत्र क.	विद्यार्थ्याचे नाव	कामाचे दिवस		उपस्थिती दिवस		उपस्थिती शेकडा		मुख्याध्यापक / प्राचार्य शिफारस (स्पष्ट उल्लेख)
			प्रथम सत्र हजर दिवस	द्वितीय सत्र हजर दिवस	प्रथम सत्र हजर दिवस	द्वितीय सत्र हजर दिवस	प्रथम सत्र हजर दिवस	द्वितीय सत्र हजर दिवस	

टिप : मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी शिफारस करताना **आवेदनपत्र रदद करावे** असा स्पष्ट उल्लेख करावा

स्थळ –

दिनांक / /202

मुख्याध्यापक / प्राचार्य
सही व शिक्का

D:/chafe/formar